**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/३३६** **दि. ०४/११/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी "जनजाती गौरव दिन" साजरा करणेबाबत.**

**संदर्भ क्र. १. मा. सहसंचालक उच्चशिक्षण पुणे विभाग, यांचे ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई२३५२८४८ यांचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे पत्र.**
**२. मा. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), उशिसं/मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक यांचे दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्सव सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी "जनजाती गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून "जनजाती गौरव दिन" उत्साहात साजरा करण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत.

शासन निर्देशानुसार, आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून "जनजाती गौरव दिन" मोठ्या उत्साहात साजरा करावा. दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी "जनजाती गौरव दिन" हा उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांमध्ये दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी "जनजाती गौरव दिन" जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांचे अहवाल शासनास सादर करावयाचे असल्याने आपल्यास्तरावर याबाबतची केलेली कार्यवाही विनाविलंब **(www.Unipune.ac.in - BOD - BOD online - Login - User Name & Passward - Online Services - Student Development - Menu - gov joint scheme - other joint scheme Add new - योजना निवडा – जनजाती गौरव दिन कार्यक्रम अहवाल) येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.** कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१**

**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**

फोननं. ०२०-२६१२७८३३, २६०५१६३२, फॅक्सनं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/२०२५/ई 2352848 दि. ०१-११-२०२५

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. कुलसचिव, सर्व अकृषि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
४. प्राचार्य /प्राचार्य, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.**

**विषय : भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.**

संदर्भ : मा. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं /मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक दि. २८-१०-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडील दि. २८-१०-२०२५ च्या परिपत्रकान्वये सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर,२०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त **"जनजाती गौरव दिन"** राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने विभागातील सर्व विद्यापीठामध्ये व महाविद्यालयामध्ये दि. १५ नोव्हेंबर, २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन **"जनजाती गौरव दिन"** उत्साहात साजरा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

**सोबत :** संदर्भिय परिपत्रक.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 02-11-2025
09:47:50

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-१६

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९ : director.dhepune@nic.in

क्र.उशिसं/मवि-१/संकीर्ण/जयंती/परिपत्रक दिनांक २८ ऑक्टोंबर २०२५

परिपत्रक

**विषय : भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस "जनजाती गौरव दिन" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन २०२५ हे वर्ष भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे. दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त **"जनजाती गौरव दिन"** राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये तसेच कार्यकक्षेतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन **"जनजाती गौरव दिन"** उत्साहात साजरा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत संचालनालयास अहवाल सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय, अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव सादर.